सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे ,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.020-26123371 E-Mail- homebranchpune@gmail.com

**वाचा :-१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005,**
**२) महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 43**
**३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897**
**४) मा.मुख्यमंत्री ,महाराष्ट्र राज्य यांचे दि.13/03/2020 रोजीचे निर्देश**

**********************************************************************************

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,**
**क्र.जि.आ.व्य/कोरोना विषाणू/121 /2020.**
**पुणे, दिनांक :- 15/03/2020.**

विषय :- कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव रोखणे करीता
शाळा व महाविदयालय बंद ठेवणेबाबत...

## सुधारित आदेश

ज्याअर्थी आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी , आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना या विषाणूचे संसर्ग बाधीत रुग्ण आढळत आहेत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत विमान प्रवासाव्दारे प्रवासी भारतात सर्वत्र प्रवास करीत आहेत .असे प्रवासी पुणे जिल्हयामध्येही परदेश प्रवास करुन आलेले आहेत व बरेच प्रवासी परतण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तत्काळ नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचे संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. अशा प्रवाशांमुळे कोरोना विषाणूचा संसर्ग जिल्हयात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव गर्दीच्या ठिकाणी जाणे, वास्तव्य करणे, इत्यादी बाबी टाळणे अत्यावश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे कोरोना विषाणूच्या प्रसाराचे माध्यम पहाता, सदर विषाणूची लागण एका संक्रमीत रुग्णाकडून अन्य व्यक्तीस/इसमास त्याच्या संपर्कात आलेने होण्याची शक्यता विचारात घेता, मी **नवल किशोर राम** ,अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हादंडाधिकारी **पुणे,** जिल्ह्यात **आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५तसेच** महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन **पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, खडकी, देहु रोड व पुणे कटक मंडळे, तसेच शहर लगतच्या गावामधील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमाच्या शाळा व महाविद्यालये व शैक्षणिक संस्था** कोरोना **विषाणूचा प्रादर्भाव रोखण्यासाठी पुढील आदेश होईपर्यंत बंद ठेवण्यात याव्यात.**

तथापि या कालावधीत इ. १० वी व इ. १२ वी सह इतर सर्व वर्गांच्या परीक्षा नियोजनाप्रमाणे सुरु राहतील. परीक्षा कक्षामध्ये बैठक व्यवस्था करताना दोन विद्यार्थ्यांच्या मध्ये एक बाक रिकामा ठेवावा. तसेच एका बाकावर एकच विद्यार्थी असेल अशी व्यवस्था करावी. तसेच जे विद्यार्थी मागील १ महिन्यामध्ये परदेशातून आलेले आहेत, त्यांच्या परीक्षेची व्यवस्था स्वतंत्र कक्षामध्ये करण्यात यावी.

महाविद्यालय/विद्यापीठ/शैक्षणिक संस्था यामध्ये जे विद्यार्थी १ महिन्याच्या कालावधीत परदेशात जाऊन आलेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना कमीत कमी १५ दिवस स्वत:च्या घरामध्ये जिथे ते राहत आहेत तिथे विलगीकरण/अलगीकरण करणे आवश्यक आहे.

परदेशातून आलेले विद्यार्थी व संशोधन सहाय्यक जर वसतीगृहात राहात असतील तर त्यांचे विलगीकरण करण्यासाठी आपल्या विद्यापीठात व विद्यापीठाच्या अधिनस्त महाविद्यालयात व शैक्षणिक संस्थामध्ये वेगळी इमारत/जागा अशाप्रकारे सुनिश्चित करावी की, ज्यामुळे इतर विद्यार्थ्यांचा संपर्क या विद्यार्थ्यांशी होणार नाही, याची जबाबदारी वार्डन/सक्षम अधिकाऱ्यास देण्यात यावी व विलगीकरण कक्ष स्थापन करावा. त्यासाठी महानगर पालिकेचे वैद्यकीय अधिकारी याचा सल्ला देऊन त्यांच्या पर्यवेक्षकीय नियंत्रणाखाली ही कार्यवाही करावी.

या आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय दंड संहिता कलम १८८ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ याव्दारे आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

(नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

प्रति,

1. **मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे**
2. **आयुक्त पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
3. **पोलीस आयुक्त, पुणे शहर व पिंपरी चिंचवड .**
4. **पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण**
5. **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे,**
6. **प्राचार्य / मुख्याध्यापक — सर्व शाळा व महाविदयालय-------------**